जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.३१/०५/२०२३
## दि.३०/०५/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे १६९/२०२३,भादविक ३०९,१८९ |
| **फिर्यादी** | सोमनाथ कुंभार, पोलीस अंमलदार, खडकी पोलीस स्टेशन,पुणे शहर |
| **आरोपीत** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ३०/०५/२०२३ रोजी १५/४५ वा. इंजीनियरींग कॉलेज चौकातील उड्डाण पुलाच्या पीलरवर, शिवाजीनगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे खडकी पोलीस ठाणे येथे कर्तव्यावर हजर असताना,खडकी पोलीस ठाणे अंतर्गत मरीआई मार्शल यांना कॉल प्राप्त झाला की,इंजीनियरींग कॉलेज चौकातील उड्डान पुलावर एक इसम ब्रिजवर चढला असुन त्याच्या हातात बॅनर आहे. फिर्यादी हे सदर ठिकाणी गेले असता,एक इसम संचेती येथील इंजीनियरींग कॉलेज चौकातील पुलाचे पिलरवर उभा राहुन,"जुन्नर येथील अधिकारी यांचेवर कारवाई झाली पाहीजे" असा बॅनर घेवुन बसला होता. तसेच सदर ब्रीजवरुन उडी मारुन,जीव देण्याची धमकी देत होता. त्यावेळी फिर्यादी यांनी तात्काळ फायर ब्रिगेड यांना संपर्क साधुन त्या इसमाला सुरक्षित ब्रिजवरुन बाजुला घेण्यात आले. तरी सदर इसमाने उड्डाण पुलाच्या पीलरवरून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला असुन,जुन्नर येथील अधिकारी यांनी त्याचे काम करावे म्हणुन त्याने नुकसान पोहचवण्याचा धाक दाखविला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संतोष भांडवलकर ९७६६६९३३३६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रामबाग पो स्टे १०८/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | आकाश भेगडे,वय-३१ वर्षे,रा.सुतारावाडी,पाषाण,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २७/०५/२०२३ रोजी २०/०० वा. ते दिनांक २८/०५/२०२३ रोजी सकाळी ०८/०० वा.चे दरम्यान नवीन मराठी शाळा,शनिवार पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची सिक्युरिटी एजन्सी असुन,सदर एजन्सी मार्फत ते शाळा,सोसायटी,कंपनी यांना सुरक्षारक्षक पुरवण्याचे काम करतात. नविन मराठी शाळा,शनिवार पेठ,पुणे येथे फिर्यादी यांचेकडील सुमित कुमार हा सुरक्षा रक्षक म्हणुन काम करीत आहे. सदर नविन मराठी शाळेच्या परिसरातील मुख्याद्यापिका केबिनच्या उजव्या परिसरातील बाजुला असलेले चंदनाच्या झाडाचा बुंधा ५,०००/- रु किंचे अंदाजे १० ते १२ फुट उंचीचा बुंधा,कोणीतरी अज्ञात इसमाने स्वतःच्या फायद्याकरीता चोरी करुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, अतुल साऴवे ७२७७३३१७१७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**